## कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

**टोल फ्री क्रमांक - १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र :- ०२४८२-२२०२५२**

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- २६.१०.२०२१

**जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना येथील श्री. जितेंद्र शिंदे, अव्वल कारकुन यांना खासगी इसमासह २,०००/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | १. लोकसेवक श्री. जितेंद्र दौलतराव शिंदे वय ५२ वर्ष व्यवसाय नोकरी अव्वल कारकुन उपविभागीय अधिकारी, कार्यालय, जालना रा. प्रयागनगर जालना<br>२. गुलाब नामदेव मोरे, वय ४० वर्ष व्यवसाय मजुरी रा. भिलपुरी ता. बदनापुर जि जालना खासगी इसम |
| २ | गुन्हा घडला तारीख ठिकाण | :- | दिनांक २६.१०.२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना येथे |
| ३ | लाचेची रक्कम | :- | २,०००/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांनी त्यांचे मुलाचे भिल्ल जातीचे प्रमाणपत्र मिळणेसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना येथे अर्ज दिला होता, सदर अर्जावरुन उपविभागीय अधिकारी कार्यालयातील अव्वल कारकुन श्री. जितेंद्र शिंदे यांनी खासगी इसमाचे मध्यस्थीने तक्रारदार यांचेकडे २,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरून दिनांक १४.०९.२०२१ रोजी सापळा लावला असता लोकसेवक अव्वल कारकुन श्री. जितेंद्र शिंदे त्यांचेसोबतचे खासगी इसम श्री. गुलाब मोरे यांचे मध्यस्थीने तक्रारदार यांचे मुलाचे भिल्ल जातीचे प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी स्वत: साठी १,०००/- रुपये व खासगी इसम यांचेसाठी १,०००/- रुपये अशी एकुण २,०००/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पण्ण झाले. त्यावरुन सापळा लावला असता आज दिनांक २६.१०.२०२१ रोजी तक्रारदार यांचे मुलाचे भिल्ल जातीचे प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी अव्वल कारकुन श्री. जितेंद्र शिंदे व त्यांचेसोबतचे खासगी इसम श्री. गुलाब मोरे यांना तक्रारदार यांचेकडुन २,०००/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष लाच स्वीकारली असतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

१. लोकसेवक श्री. जितेंद्र दौलतराव शिंदे वय ५२ वर्ष व्यवसाय नोकरी अव्वल कारकुन उपविभागीय अधिकारी, कार्यालय, जालना रा. प्रयागनगर जालना (वर्ग ३ ) व २. गुलाब नामदेव मोरे, वय ४० वर्ष व्यवसाय मजुरी रा. भिलपुरी ता. बदनापुर जि जालना खासगी इसम यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.९८२३३६५६७७, पोलीस निरीक्षक मो.नं. ८३९०७५७८३५, ९८२३२१६७८८ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.